क्रमांक: इएसटी २०२४/प्र.क्र.०७/का.२
विधि व न्याय विभाग, मादाम
कामा रोड,हुतात्मा राजगुरु
चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०५ जून, २०२४.

प्रति,

वरिष्ठ सहायक संचालक (जाहीरात प्रकाशन),
माहीती व जनसंपर्क महासंचालनालय ,
नवीन प्रशासकिय भवन , १७ वा मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

विषय:- विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे सेवानिवृत्त उच्च श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) व निम्न श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत

महोदय,

सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधिन राहून विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे सेवानिवृत्त उच्च श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) व निम्न श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे. याबाबतच्या जाहिरातीचा विहित नमूना सोबत जोडला आहे. ही सूचना स्थानिक मराठी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याची आपणास विनंती करण्यात येत आहे.

२. सदर जाहिरात दि.१०.०६.२०२४ पर्यंत प्रसिध्द करण्यात यावी.

३. या जाहिरातीची देयके कार्यासन अधिकारी (कार्यासन २), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्या नावाने पाठविण्यात यावीत.

आपला,
(रा.बा.घाडगे)
सह सचिव (प्रशासन)

सहपत्र :- वर नमूद जाहिरात

प्रति ,

१) कार्यासन अधिकारी (कार्यासन-७), विधि व न्याय विभाग, मुंबई यांच्याकडे सदर जाहिरात विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

२) निवडनस्ती

विधि व न्याय विभाग , मंत्रालय , मुंबई येथे सेवानिवृत्त उच्च श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) व
निम्न श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत

विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे सेवानिवृत्त उच्च श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) व निम्न श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत करावयाची आहे. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. संकिर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे. अधिक माहिती विभागाचे संकेतस्थळ https://maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी वेबसाईट वरील माहिती पाहून जाहिरातीच्या दिनांकापासून आठ दिवसांच्या आत अर्ज " अवर सचिव (कार्यासन २), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, ॲनेक्स इमारत, ३ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२ " या पत्त्यावर पाहोचेल अशा रितीने पाठवावा.

(रा.बा.घाडगे)
सह सचिव, विधि व न्याय विभाग,
०२२-२२०२३४१३

विधि व न्याय विभाग , मंत्रालय , मुंबई येथे सेवानिवृत्त उच्च श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) व
निम्न श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत

विभागाची आवश्यकता व अटी व शर्ती :-

१) विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे सेवानिवृत्त उच्च श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) या संवर्गाची २ पदे व निम्न श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) या संवर्गाची २ पदे शासन सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांमधुन करार पद्धतीने भरावयाचे आहे.

२) सदर कर्मचारी शासन सेवेतून सेवानिवृत्त झालेला असावा व त्याला इंग्रजी लघुलेखनाचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) सदर कर्मचाऱ्यास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

(४) सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार एक वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात येणार आहे.

(५) सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

(६) सेवानिवृत्त कर्मचारी शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा,तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

(७) नियुक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

(८) कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त कर्मचारी प्रधान सचिव व विधि परामर्शी यांच्या नियंत्रणाखाली काम करतील .

(९) कर्मचाऱ्याने सदर पदाकरिता सोबत जोडलेल्या नमुन्यात सुवाच्च अक्षरात अर्ज लिहून अथवा टंकलेखित करून विभागास पाठवावा.

(१०) कर्मचाऱ्याने सदर पदाकरिता जाहिरातीच्या दिनांकापासून आठ दिवसांच्या आत "अवर सचिव (कार्यासन २), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, ॲनेक्स इमारत, ३ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२" या पत्त्यावर पाहोचेल अशा रितीने पाठवावा. अधिक माहितीसाठी ०२२-२२७९३६१० या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

------------------

# अर्जाचा नमुना

## विधि व न्याय विभाग , मंत्रालय , मुंबई येथे सेवानिवृत्त उच्च श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) व निम्न श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत

उमेदवाराने
अलिकडच्या काळातील
स्वत:चे छायाचित्र येथे लावावे

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :-

२. अर्जदाराचा पत्ता :-

३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम
व कार्यालय :-

४. जन्म दिनांक व वय :-

५. सेवानिवृत्तीचा दिनांक :-

६. शैक्षणिक अर्हता :-

७. अनुभव :-

८. भ्रमणध्वनी क्रमांक :-

उपरोक्त पदावर करार पद्धतीने नियुक्तीबाबत जाहिरात/ सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :
दिनांक :

अर्जदाराची स्वाक्षरी